


रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २२५
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, २ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

रायगडात ७४ केंद्रांवर दहावीची परीक्षा सुरू/२
उल्हास नदीतील भिंतीवरून कर्जत भाजप आक्रमक/५
अलिबाग प्रीमिअर लीगचे शानदार उद्घाटन/८

# आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून उरण विधानसभा मतदारसंघात विकासाची गंगा

## मंत्री रवींद्र चव्हाण यांचे गौरवोद्गार; १०० कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**मोहोपाडा : राकेश खराडे**

प्रत्येक लोकप्रतिनिधी हा त्याच्या मतदारसंघामध्ये आवश्यक असणारा निधी कसा उपलब्ध होईल यासाठी प्रयत्नशील असतो, परंतु एखादा लोकप्रतिनिधी असा असतो की जो त्यामध्ये विशेष असे प्रयत्न करतो. काम, निधी मंजूर होण्यासाठी सातत्य, पाठपुरावा लागतो आणि ते आमदार महेश बालदी करतात. म्हणूनच उरण विधानसभा मतदारसंघात विकासाची गंगा अवतरली आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी गुरुवारी (दि.२९) येथे केले.

कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून होत असलेल्या सुमारे १०० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा मोहोपाडा येथील अचानक मैदानावर उत्साहात झाला. त्या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण बोलत होते. या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जि.प.सदस्य ज्ञानेश्वर घरत, राष्ट्रवादीचे नेते व मोहोपाडा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप मुंढे, सरपंच उमाताई मुंढे, उपसरपंच भूषण पारंगे, चौकच्या सरपंच रितू ठोंबरे, तुपगावचे सरपंच सरपंच रवींद्र कुंभार, सावळे सरपंच सुनील माळी, कराडे खुर्दच्या उपसरपंच मिनल ठोंबरे, माजी सरपंच किरण माळी, विजय मुरकुटे, वडगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सुरेश पाटील, भाजप गुळसुंदे जि.प.विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, प्रवीण जांभळे, वासांबे जि.प.विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, पं.स. विभागीय अध्यक्ष आकाश जुईकर, प.ग. पळणीटकर, वर्षा पाटील, चेतन जाधव, संदीप म्हात्रे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (पान २ वर..)




(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

### मोहोपाडा, चौक परिसराला नवी झळाळी मिळणार -आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, उरण विधानसभा मतदारसंघात हजारो कोटींची कामे होताना दिसत आहेत. यासाठी मी आमदार महेश बालदी यांचे मनापासून अभिनंदन करतो. या परिसरापासून जेएनपीटीला जोडणारा जो ३५०० कोटींचा महामार्ग साकारणार आहे तो खऱ्या अर्थाने पुढच्या कालावधीत गतवैभव प्राप्त करून देईल आणि या मोहोपाडा, चौक परिसराला नवी झळाळी मिळले. इतके परिवर्तन त्या एका रस्त्याच्या माध्यमातून सगळ्या परिसरात होणार आहे.

*कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून आज या ठिकाणी डिजिटल माध्यमाद्वारे विकासकामांचा शुभारंभ होत आहे. कोट्यवधींचा निधी आणून लोकहित साधण्याचे काम आपल्या माध्यमातून होत आहे. या विभागात न भुतो न भविष्यति असा भरघोस निधी आणून आपण विकासाची गंगा आणलेली आहे. त्यासाठी मी त्यांचे आभार मानते.*

**–उमाताई मुंढे,** *सरपंच, मोहोपाडा*

### जनहित अन् परिसर विकासासाठी कटिबद्ध -आमदार महेश बालदी

जनहितासाठी एमएमआरडीएकडून ५० कोटी रुपये नियम मोडून आणले आणि त्यातूनही आज मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भूमिपूजन होत आहे, असे सांगून आमदार महेश बालदी म्हणाले की, संघर्षातून जे मिळते त्याचे समाधान मोठे असते. वासांबे (मोहोपाडा), चौक ग्रामपंचायत असेल या ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले आहे, तर येथील लोकांना सभागृह, बगीचा, मैदान, घाट, तलाव, बालोद्यान बनवून देणे आवश्यक आहे. यापुढेही परिसरात आवश्यकतेनुसार सोयीसुविधा उपलब्ध करून देत राहणार आहे.

## जागावाटपावरून ठाकरे गट-काँग्रेस वाद : डॉ. आंबेडकर

**नागपूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या जागावाटपावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी, काँग्रेस आणि शिवसेनेत भांडणे सुरू आहेत. आम्ही तर उपरे आहोत. त्यांची भांडणे संपल्यानंतर आमच्याशी चर्चा करतील, असे म्हटले आहे

आम्ही २८ जागांचा प्रस्ताव दिला आहे. आघाडी झाली नाही, तर स्वतंत्रपणे निवडणूक लढवू व किमान सहा जागांवर विजय मिळवू, असेही आंबेडकर म्हणाले.

## राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील (एनपीएस) बाजारामधील चढ-उतारामुळे निर्माण होणारी गुंतवणुकीविषयी जोखीम राज्य शासन स्वीकारेल असे जाहीर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय शुक्रवारी (दि.१) विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जाहीर केला.

**मुख्यमंत्र्यांची घोषणा**

या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्तावाढ तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के इतके कुटूंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्तावाढ मिळणार आहे. कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने व कुटुंबियांच्या दृष्टीनेही हा निर्णय हितकारक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. (सविस्तर वृत्त पान २ वर..)

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीमुळे पनवेलमध्ये रस्त्यांच्या विकासासाठी निधी

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानले आभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीनुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांच्या विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे.

मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष रस्ता अनुदान योजनेंतर्गत पनवेल महापालिका हद्दीतील उपजिल्हा रुग्णालयाच्या बाजूचा रस्ता (ठाणा नाका रोड ते स्वामी नित्यानंद रोडला जोडणारा रस्ता अर्थात अंतिम भूखंड क्रमांक ५०/८ ते ५०/१३) विकसित करण्यासाठी २५ लाख रुपये, राजीव गांधी पार्कसमोरील रस्त्यासाठी (अंतिम भूखंड क्रमांक ४५८ ते ४९७, ४५९, ४९५) ७५ लाख रुपये; तर अंतिम भूखंड क्रमांक २९६ ते ४२१/१ ब पर्यंतचा रस्ता व अंतिम भूखंड क्रमांक ४१५ ते अंतिम भूखंड क्रमांक ४१०पर्यंत (पनवेल आयटीआय बाजूचा रस्ता) व अंतिम भूखंड क्रमांक ४१४ व ४१५मधील रस्त्यांच्या विकासासाठी चार कोटी रुपये अशा एकूण पाच कोटी रुपये निधीची



मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यानुसार या रस्त्यांच्या विकासाकरिता निधी मंजूर करण्यात आला असून त्या संदर्भातील शासन निर्णय जारी झाला आहे.

पनवेल परिसराचा झपाट्याने विकास होऊन नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर हे कायम प्रयत्नशील असतात. त्या अनुषंगाने आणखी एका विकासकामासाठी निधी मंजूर झाला आहे. यामुळे पनवेलमधील संबंधित रस्ते विकसित होऊन नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

## पनवेलमध्ये आज नमो चषक महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा

**मान्यवरांची लाभणार उपस्थिती**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी व देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात झाला.

या अनुषंगाने पनवेल विधानसभा मतदारसंघात रंगलेल्या नमो चषक २०२४ महोत्सवात एक लाख १३ हजार २७८ स्पर्धकांनी सहभाग घेऊन महाराष्ट्रात चौथा क्रमांक पटकाविला आहे. या महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (दि.२) दुपारी ३ वाजता पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी क्रिकेटपटू तथा प्रशिक्षक दिलीप वेंगसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यास क्रीडापटू व क्रीडारसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन माजी सभागृह नेते परेश ठाकूर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस अभिषेक भोपी, दिनेश खानावकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, खारघर अध्यक्ष नितेश पाटील, कळंबोली अध्यक्ष गौरव नाईक यांनी केले आहे.



# शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित निवृत्तीवेतन योजना

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधिमंडळात घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील (एनपीएस) बाजारामधील चढ-उतारामुळे निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासन स्वीकारेल, असे जाहीर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा निर्णय शुक्रवारी (दि.१) विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जाहीर केला. या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे.



राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुधारीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री निवेदनात म्हणाले की, दिलेल्या आश्वासनानुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुधारीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव व सेवा विभागाचे अपर मुख्य सचिव यांनी संघटनेसोबत चर्चा करून सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची तत्वे निश्चित केली आहेत. त्यास अधिकारी, कर्मचारी संघटनेनेही सहमती दर्शवली आहे. समितीचे निष्कर्ष व शिफारशी विचारात घेऊन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील बाजारामधील चढ-उतार यामध्ये निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्विकारावी हे शिफारशीतले तत्त्व मान्य करून राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल याबाबतीत राज्य शासनातर्फे यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

या आर्थिक वर्षात राज्यामध्ये राज्य सरकारी कर्मचारी तसेच राज्य स्वायत्त संस्थेतील कर्मचाऱ्यांची संख्या १३ लाख ४५ हजार इतकी असून यामध्ये राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असणारे कर्मचारी आठ लाख २७ हजार इतके आहेत. त्यावर शासनामार्फत जुन्या निवृत्तीवेतन योजनेवर ५२ हजार ६८९ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत शासनाचा हिस्सा हा सात हजार ६८६ कोटी रुपये इतका आहे. याशिवाय एकूण वेतनावरील खर्च एक लाख २७ हजार ५४४ कोटी इतका आहे.

## मत्स्यसंवर्धनासाठी रायगडात ४५ ठिकाणी कृत्रिम भिंतींची होणार उभारणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

पंतप्रधान मत्स्यसंपदा योजनेंतर्गत कोकण किनारपट्टीवर मत्स्य संवर्धनासाठी कृत्रिम भितींचीका उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. समुद्राच्या तळाशी शास्त्रोक्त पद्धतीने कोकणात १२१ ठिकाणी कृत्रिम भिंतींची उभारणी केली जाणार आहे. त्यापैकी रायगड जिल्ह्यात २० गावाजवळील ४५ ठिकाणी कृत्रिम भिंतींची उभारणी करण्यात येणार आहे.

कृत्रिम भिंती हे मासळी एकत्रित करण्याचे एक शास्त्रोक्त अभ्यास करून तयार केलेले साधन आहे, ज्यात सिमेंट, लोखंड दिर्घकाळ टिकणाऱ्या वस्तूंचा वापर करून पोकळ स्वरूपाच्या रचनांची निर्मिती केली जाते. नंतर त्यांची समुद्राच्या तळाची मांडणी केली जाते. माश्यांना सुरक्षित वातावरण तयार झाल्याने ते या ठिकाणी अधिवास करण्यास सुरुवात करतात व या ठिकाणी प्रजननाला सुरुवात करतात.

पंतप्रधान मत्स्यसंपदा योजनेंतर्गत समुद्राच्या तळाशी २० मीटर खोलीवर दोन हजार स्वेअर मीटरच्या भिंती उभारण्याचे काम करण्यात येणार आहे. विशिष्ट रचनेत उभ्या आडव्या संरचनेत या भिंती पसरवल्या जाणार आहेत. यामुळे समुद्राच्या तळाची मत्स्य संवर्धनासाठी कृत्रिम अधिवास तयार होण्यास मदत होणार आहे.

रायगड जिल्ह्यात ४५ ठिकाणी, रत्नागिरी जिल्ह्यात ३६ ठिकाणी तर सिंधुदूर्ग जिल्ह्यात ४० ठिकाणी कृत्रिम भिंती उभारल्या जाणार आहेत.

रायगड जिल्ह्यात अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यात समुद्रात कृत्रिम भिंती उभारणीचे काम सध्या सुरू आहे. २० गावाजवळील ४५ ठिकाणे यासाठी निवडण्यात आली आहेत. या प्रकल्पामुळे रायगड जिल्ह्यात मत्स्यप्रजातीचे संवर्धन आणि उत्पादन वाढीसासठी मदत होणार आहे, अशी माहिती रायगडचे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त संजय पाटील यांनी दिली.

## रायगड जिल्ह्यात ७४ केंद्रांवर दहावीची परीक्षा सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य शिक्षण मंडळामार्फत घेतली जाणारी इयत्ता दहावीची परीक्षा शुक्रवारपासून (दि.१) सुरू झाली आहे. रायगड जिल्ह्यात ७४ केंद्रांवर ३७ हजार २७७ विद्यार्थी दहावीची परीक्षा देत आहेत. २६ मार्चपर्यंत ही परीक्षा सुरू राहणार आहे. जिल्ह्यात संवेदनशील परीक्षा केंद्र एकही नाही.

परीक्षेदरम्यान अनुचित प्रकार घडू नये यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. परीक्षेसाठी रायगड जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात तालुका स्तरावर एक भरारी पथक नेमण्यात आले आहे, तसेच माध्यमिक, प्राथमिक शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (योजना), प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची पाच भरारी पथके असणार आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक परीक्षा केंद्रावर योग्य तो पोलीस बंदोबस्त असणार आहे.

उत्तरपत्रिकेची गोपनीयता राहण्यासाठी सहायक परीरक्षक बैठे पथक म्हणून परीक्षा केंद्रावर कार्यरत राहतील, तसेच प्रश्नपत्रिकांची गोपनीय पाकिटे ताब्यात घेतल्यापासून वितरित करेपर्यंतचे चित्रीकरण करण्यात येईल.



सहाय्यक परीरक्षक यांनी त्यांच्या मोबाईलचे जीपीएस सुरू ठेवणे आवश्यक आहे. परीक्षेच्या वेळेनंतर १० मिनिटे वाढवून देण्यात आली आहेत.

## उरण स्टेशन ते कोटनाका रस्त्यावर पथदिव्यांची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण रेल्वेस्टेशनचे उद्घाटन जानेवारीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. रोज रेल्वे प्रवास करणाऱ्यांमध्ये शालेय विद्यार्थी, महिला, जेष्ठ नागरिक, दिव्यांगांचा मोठा सहभाग आहे, परंतु उरण रेल्वेस्टेशन ते कोटनाकापर्यंत रोडवर पथदिवे नसल्याने संध्याकाळनंतर पूर्णतः अंधार पसरला जातो. नागरिकांना अंधारातून पायपीट करावी लागते. त्यामुळे या परिसरात पथदिवे लावण्याची मागणी होत आहे.

या परिसरात पथदिवे नसल्याने अंधारातून पायपीट करीत असताना विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना अंधाराचा फायदा घेऊन लुटमार, चोरी, छेडछाड असे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून सुरक्षेच्या कारणास्तव उरण रेल्वेस्टेशन ते कोटनाका मुख्य रोडवर लवकरात लवकर पथदिवे बसविण्याची मागणी प्रवासी करीत आहेत.

## सिडको उपाध्यक्षांकडून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडको महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी शुक्रवारी (दि.१) सिडकोच्या उलवे येथील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पस्थळाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी प्रकल्पाची अंमलबजावणी गतीने व वेळेत व्हावी याकरिता संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या.

या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक शांतनु गोयल, दिलीप ढोले, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) शीला करुणाकरन, मुख्य कार्यकारी अधिकारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कॅप्टन बीव्हीजेके शर्मा यांसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा राष्ट्रीय दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने आणि नियोजित वेळेत व्हावी, या उद्देशाने प्रकल्पाच्या भौतिक प्रगतीचा आढावा घेणे, हे या भेटीमागील प्रयोजन आहे, असे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले.



पान १ वरुन

## आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून उरण विधानसभा मतदारसंघात विकासाची गंगा

आपल्या भाषणात मंत्री रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वामध्ये संपूर्ण देशभर सबका साथ सबका विकास या मंत्राने प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणामध्ये विकास होताना तुम्हाला आम्हाला सर्वांना दिसत आहे. हा विकास होत असताना या मतदारसंघामध्ये विकासनिधी कसा मिळेल यासाठी आमदार महेश बालदी प्रयत्न व पाठपुरावा करीत असतात. येणाऱ्या काळात हा संपूर्ण जो भाग आहे येथे असणाऱ्या जास्त लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींची नगरपंचायत किंवा नगर परिषद होणे अत्यंत गरजेचे आहे आणि मला खात्री आहे की आमदार महेश बालदी व त्यांच्यासोबत असणारे सर्व सहकारी त्या दिशेने पावले उचलतील, जेणेकरून स्थानिक पातळीवर नियोजनाला चांगल्या पद्धतीने गती मिळेल. त्यांच्या पाठीशी आपण सर्वजण खंबीरपणे उभे राहूया.

उरण मतदारसंघात असलेल्या आधीच्या आमदारांना काय जमले नाही, कारण कूपमंडूक वृत्ती. स्वतःच्या मर्यादित क्षेत्राच्या पलीकडे पहायचे नाही आणि केवळ सरकार जे करेल त्याला मी केले अशा पद्धतीने त्याच्यावर फुशारकी मारायची याच्या पलीकडे त्यांनी कधी काही करता आले नाही, परंतु आमदार महेश बालदी या मतदारसंघात फिरत असतात, तेव्हा त्यांच्या डोक्यात सदैव जनहित व परिसर विकासाचा विचार असतो, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

वडगाव ग्रामपंचायत हद्दीत बोरीवली गावाजवळ एक बायोमेडिकल वेस्ट प्रकल्प जो गोवंडीला नकोसा झाला होता तो इथे येऊ घातलाय. त्याला सर्व सरपंच, नागरिक म्हणून आम्ही विरोध केलाय, पण तुम्हीसुद्धा पाठपुरावा करावा, असा सूर या वेळी व्यक्त झाला. त्यावर आमदार महेश बालदी म्हणाले की, मी या ठिकाणी शब्द देतो. आपण सर्व एकत्र आहोत. एकमुखाने बोरीवली येथे येऊ घातलेल्या विघातक प्रकल्पाला विरोध करू.

या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते कोन-सावळे रस्ता तयार करणे ५० कोटी रुपये, चौक-लोहोप रस्ता सहा कोटी, दांड-मोहोपाडा-तुराडे रस्ता २१ कोटी, गुळसुंदे-कराडेदरम्यान नदीवर ब्रिज १० कोटी, रिस पाणीपुरवठा योजना २२ कोटी, मोहोपाडा तलाव सुशोभीकरण चार कोटी, चौक तलाव सुशोभीकरण तीन कोटी, जांभिवली-कराडे रस्ता तीन कोटी, पळस्पे-कुडावेदरम्यान नदीवर ब्रिज २.५० कोटी, पळस्पे-वडवली रस्ता दोन कोटी, चौक येथे सभागृह एक कोटी, बोरगाव सभागृह एक कोटी, तळेगाव-पानशिल, वयाळ-वाशिवली रस्ता आठ कोटी, मोहोपाडा बाजारपेठ रस्ता एक कोटी आदी विकासकामांचे एलईडी स्क्रीनद्वारे डिजिटल भूमिपूजन करण्यात आले.

या सोहळ्यात वासांबे ग्रामपंचायतीचे ठाकरे गटाचे माजी सदस्य स्वप्नील राऊत यांनी समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यासह अन्य मान्यवरांकडून स्वागत करण्यात आले, तर मंत्री रवींद्र चव्हाण यांना भाजप रसायनी महिला मोर्चाच्या वतीने अयोध्या येथील रामलल्लाच्या मूर्तीची प्रतिकृती भेट नेहा भूषण पारंगे, संचिता सचिन तांडेल, रितू सुधीर ठोंबरे, अरुणा विनायक मुंढे, मनीषा दिलीप कर्णूक यांनी दिली.

## पालीत उरूसमध्ये घडले हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दर्शन





**पाली : प्रतिनिधी**

पालीत हजरत शहा शरफुद्दीन बाबा उरूसनिमित्त धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात हिंदू-मुस्लिम बांधवांनी सहभाग घेतला.

पालीतील उरूस कार्यक्रमात हिंदू मुस्लिम बांधवांच्या एक्याचे अनोखे दर्शन घडले. यानिमित्त खालच्या मोहल्ल्यातून दर्ग्यात संदल मिरवणूक काढण्यात आली, तर रात्री प्रबोधन, मनोरंजन व संगितबद्ध कार्यक्रमात गजलोका बादशहा अतिष मुराद व मशहूर कव्वाल सनम साहिबा यांच्यात कव्वालीचा जंगी कार्यक्रम झाला. या वेळी गायलेली देशभक्तीपर गीतांनी सर्वांची मने जिंकली. कव्वालीचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी कव्वालीप्रेमींनी मोठी उपस्थिती दर्शविली होती. उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल व पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उरूस कमिटी अध्यक्ष सुलतान बेनसेकर, उपाध्यक्ष अकिल महाडकर, सर्व पदाधिकारी व मुस्लिम समाजबांधवांनी मेहनत घेतली. दरम्यान आमदार अनिकेत तटकरे यांनीदेखील हजरत शहा शरफुद्दीन बाबा उरूसनिमित्त भेट देऊन दर्शन घेतले.

## विसपुते कॉलेजला कौशल्य विकास केंद्रास मान्यता

**पनवेल : प्रतिनिधी**

श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन नवीन पनवेलला महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार व उद्योजकता विकास विभागातर्फे प्रमोद महाजन कौशल्य आणि उद्योजकता विकास अभियाना अंतर्गत महाविद्यालय कौशल्य विकास केंद्र म्हणून मान्यता मिळाली आहे.



यासंबंधीचा सामंज्यस्य करार हा मंगळवार (दि. २७) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विकास केंद्र व श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन नवीन पनवेल यांच्या दरम्यान अलिबाग येथे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विकास केंद्र सहाय्यक आयुक्त अमिता पवार आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य ॲड. डॉ. सीमा कांबळे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या वेळी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने जिल्हा कौशल्य विकास समन्वयक मोहसीन वस्ता व महाविद्यालयाच्या वतीने प्रा. नेहा म्हात्रे, डॉ. प्रितेश वाढे व राकेश कांबळे हे उपस्थित होते.

या अंतर्गत महाविद्यालयामध्ये रोजगाराभिमुख अल्प कालावधी असलेल्या आधुनिक अभ्यासक्रम चालवून त्यांचे प्रशिक्षण देण्यात देण्यात येणार आहे व या कराराच्या माध्यमातून रोजगार प्रतिक्षित युवक व युवतींना रोजगार प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठीचे प्रयत्न करण्यात येणार असल्याचे महाविद्यालयाच्या प्राचार्य ॲड. डॉ. सीमा कांबळे यांनी सांगितले.

विशेष म्हणजे संपूर्ण रायगड जिल्ह्यातून केवळ दोन महाविद्यालयांना अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र चालवण्याची मान्यता मिळाली आहे त्या मध्ये श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन नवीन पनवेल हे एकमेव शिक्षणशास्त्र महाविद्यालय आहे. या यशाबद्दल आदर्श शैक्षणिक समुहाचे चेअरमन धनराज विसपुते आणि संचालिका संगीता विसपुते यांनी महाविद्यालयाचे कौतुक केले व या नवीन उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## कामात कसूर करणाऱ्या १४ मंडळ अधिकाऱ्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

शासकीय कामात कसूर करणे तसेच शासकीय कार्यालयातील वारस नोंदी, नोंदणीकृत दस्तांची नोंदणी करण्यास टाळाटाळ करणे व काम पूर्ण करण्यास चालढकल करणे, अशा १४ मंडळ कामचुकार मंडळ अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे निर्देश निवासी रायगड उपजिल्हाधिकारी संदिक शिर्के यांनी केली आहे. या कारवाईमध्ये पनवेल तहसील कार्यकायातील पोयंजे विभागातील मंडळ अधिकारी मनोज मोरे यांचादेखील समावेश आहे.

कोणतीही नोंद एक महिन्यापेक्षा जास्त तसेच विवादग्रस्त नोंद तीन महिन्यापेक्षा जास्त प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेऊन विहित कालमर्यादित गुणवत्तापूर्वक कामकाज करण्याच्या सूचना व तसे निर्देश देण्यात आले आहे. हे निर्देश देऊनदेखील कामामध्ये विलंब करणाऱ्या १४ मंडळ अधिकाऱ्यांवर कायद्याच्या बडगा उचलून निवासी उपजिल्हाधिकारी शिर्के यांनी कारवाई करत या सर्व अधिकाऱ्यांच्या बदल्या अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालय अभिलेख कक्षात एक आठवड्यासाठी करण्यात आल्या आहेत.

या मंडळ अधिकाऱ्यांमध्ये पनवेल तहसील कार्यालयाच्या हद्दीतील पोयंजे विभागाचे मंडळ अधिकारी मनोज मोरे यांच्यावरदेखील कारवाई करण्यात आली आहे.

# पनवेल पालिका हद्दीतील कामांना येणार वेग

## विभागप्रमुखांच्या बैठकीत जलद गतीने कार्यवाही करण्याच्या सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा शुक्रवारी (दि.१) मुख्यालयात झालेल्या बैठकीत प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांनी घेतला. या वेळी विकासकामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित विभागास दिल्या.



बैठकीला उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी ज्योती कवाडे, मुख्य अभियंता संजय जगताप, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखापरिक्षक संदिप खुरपे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, उपअभियंता विलास चव्हाण, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण उपस्थित होते.

नवीन भरती झालेल्या कर्मचाऱ्यांचे सुरुवातीपासून कार्यालयीन सर्व कामकाज ऑनलाईन करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्तांनी संबधित विभागास सूचना दिल्या. भरती प्रक्रियेचे कामकाज उत्तम पध्दतीने केल्याबद्दल उपायुक्त कैलास गावडे व आस्थापना विभागाचे आयुक्तांनी अभिनंदन केले, तसेच मराठा आरक्षणासंदर्भात सर्वेक्षण कामाची जबाबदारी उत्तमरित्या बजावल्याबद्दल उपायुक्त गणेश शेटे तसेच त्याच्या पथकाचे अभिनंदन केले.

याबरोबरच मुख्यालय बांधकाम, महापालिकेच्या गाड्यांसाठी वर्कशॉप बांधणे, पालिकेतील कामकाज पेपरलेस करण्याच्या दृष्टीने संगणक विभागाने नियोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. विविध ठिकाणी पालिकेच्या शाळा सुरू करण्याच्या दृष्टीने नियोजन करणे, तसेच जिल्हा परिषदेकडून हस्तांतरीत झालेल्या शाळांचे नूतनीकरण, पुनर्बांधणी याबाबतच्या कामांना गती देण्याच्या सूचना संबधित विभागास आयुक्तांनी दिल्या.

याचबरोबर शवविच्छेदनगृहासाठी जागा देणेबाबत सिडकोकडे पाठपुरावा करणे, महापालिका हद्दीतील रोज बाजार विकसित करणे, चारही प्रभाग कार्यालयांच्या बांधकामाचा आढावा, सिडकोकडील भूखंड हस्तांतरण करणे, कळंबोली येथील ७२ खाटांचे रुग्णालय उभारणे, नवीन युपीएचसी बांधकाम आढावा, महापालिका हद्दीतील सर्व उड्डाणपूलांचे सौंदर्यीकरण करणे, रात्र निवारा, राजीव गांधी मैदान, छत्रपती संभाजी महाराज मैदान विकसित करणे या कामांचा आढावा घेऊन कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

# भाजप महाराष्ट्र प्रदेश स्पोर्ट्स सेलतर्फे क्रीडा महोत्सव



नियोजनाबाबत बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश स्पोर्ट्स सेलच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. या महोत्सवासंदर्भात चर्चा करण्यासाठी स्पोर्ट्स सेलचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. संदीप भोंडवे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि.१) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



पनवेल शहरातील भाजपच्या तालुका आणि शहर मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या बैठकीमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस क्रीडा महोत्सवाच्या नियोजनाबाबत उपस्थित पदाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. या वेळी भाजप स्पोर्ट्स सेलचे महाराष्ट्र राज्य सचिव शिवाजी साळुंखे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष विनोद नाईक, उपाध्यक्ष मंदार पनवेलकर, पनवेल तालुका क्रीडा सेल अध्यक्ष मनोहर पाटील, पनवेल शहर स्पोर्ट्स सेल अध्यक्ष हितेश कडू यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# अमली पदार्थांची खरेदी-विक्री करणारे दोन जण गजाआड

### ● आठ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील फॉरेस्ट कॉलनी परिसरात एलएसडी पेपर या अमली पदार्थाची विक्रीसाठी आलेल्या व त्याला पुरवठा करणाऱ्या दोन तरुणांना नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने सापळा लावून अटक केली.

ओंकार खुटले (२३) व ललित पवार (२४) अशी त्यांची नावे असून अमली पदार्थविरोधी पथकाने त्यांच्याकडून सुमारे आठ लाख रुपये किमतीचे १.३२ ग्रॅम वजनाचे ५३ एलएसडी पेपर जप्त केले आहेत. या कारवाईत पोलिसांनी चार लाखांची कार व मोबाईलही हस्तगत केले आहे.

पनवेलमधील फॉरेस्ट कॉलनी परिसरात एक तरुण अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ निरीक्षक नीरज चौधरी व त्यांच्या पथकाने पनवेलमधील सम्राट हॉटेल व परिसरात सापळा लावला. या वेळी एका कारमधून ओंकार खुटले हा तरुण संशयास्पदरित्या फिरताना आढळला. अमली पदार्थविरोधी पथकाने त्याची धरपकड करून झडती घेतली असता, त्याच्याजवळील पिशवीमध्ये सुमारे आठ लाख रुपये किमतीचे ५३ एलएसडी पेपर आढळले.

अमली पदार्थविरोधी पथकाने खुटलेकडे सापडलेले एलएसडी पेपर जप्त करून चौकशी केली असता केली असता, त्याने बालाजी आंगन सोसायटीत राहणाऱ्या ललित पवार याच्याकडून ते घेतल्याचे सांगितले. त्यानुसार पथकाने ललित पवारला ताब्यात घेतले. दोघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

# पनवेलचे फडके नाट्यगृह दुरूस्ती कामासाठी राहणार बंद

**पनवेल : वार्ताहर**

१० वर्षांपासून पनवेलकरांची सांस्कृतिक भूक भागविणाऱ्या पनवेल शहरातील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे अंतर्गत दुरूस्तीचे काम पनवेल महापालिकेच्या वतीने हाती घेण्यात येणार असून त्यासाठी ५५ लाख रुपये खर्च पालिका प्रशासन करणार आहे. हे काम करता यावे म्हणून नाट्यगृह व्यवस्थापनाने मार्च व एप्रिलदरम्यानच्या नाटक व कार्यक्रमांच्या आगाऊ बुकींग घेतलेल्या नाहीत, परंतु नेमके हे नाट्यगृह कधीपासून व कधीपर्यंत बंद राहिल हे पालिकेने जाहीर केले नाही. याबाबत अद्याप चर्चा सुरू असल्याचे पालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.



आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाची आसन क्षमता ६५० आहे. नाट्यगृहातील रंगमंचाच्या खालील लाकडी साचा निकळण्याच्या तक्रारी नाट्य कलावंतांकडून झाल्या होत्या, तसेच रंगमंचाजवळील पडद्याची व्यवस्था, विंग, वीज व्यवस्थेच्या तक्रारी होत्या. काही खुर्च्या नादुस्स्त असून त्या बदलण्याची मागणी प्रेक्षकांकडून केली जात होती. कार्पेट बदलणे अशा इतर कामांसाठी ५५ लाख रुपयांचा खर्च पालिका प्रशासन करणार आहे. मार्च आणि एप्रिल महिन्यातील ६० दिवस फडके नाट्यगृह कामासाठी बंद ठेवून ही कामे तातडीने करुन घ्यावीत असे पालिकेचे नियोजन असल्याची माहिती नाट्यगृहाचे व्यवस्थापक राजेश डोंगरे यांनी सांगितले.

या नाट्यगृहाचा सर्वाधिक वापर नाटकांपेक्षा पालिकेच्या सर्वसाधारण सभागृहासाठी झाला, तसेच केंद्र व राज्य सरकारचे विविध प्रशिक्षणाचे कार्यक्रम याच नाट्यगृहात झाली. निवडणूक आयोगाने यापूर्वी याच नाट्यगृहाचा सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी वापर केला असल्याने हे नाट्यगृह आचारसंहितेवेळी पालिकेला निवडणूक आयोगाने मागितल्यास काय करावे, असा प्रश्न पालिकेला पडला आहे.

पालिकेने मार्च ते एप्रिल या दोन महिन्यात नाटकांची बुकींग घेतली नसली तरी नाट्यगृहाचे काम नेमके कधी सुरू करावे,याबाबत अद्याप पालिकेत चर्चा सुरू आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी पदाधिकारी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तालुक्यातील न्हावे येथील चंद्रकांत भोईर यांच्या निवासस्थानी सत्यनारायणाच्या पुजेनिमित्त भेट देत पंकज भोईर व अनिष्का भोईर या नवदाम्पत्याला आशीर्वाद दिले. या वेळी सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर तसेच किशोर घरत, चंद्रकांत पाटील, विशाल भोईर, विनोद पाटील, दीपक भोईर, अमरनाथ पाटील, जय घरत आदी उपस्थित होते.**

# नरेंद्राचार्य महाराज पादुका दर्शन सोहळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा १२ मार्च रोजी श्री कानकेश्वरी मैदान, नवघर पाडा बसस्टॉपशेजारी, उरण येथे आयोजित करण्यात आला आहे.

या शुभदिनी नरेंद्राचार्य महाराज यांच्या सिद्ध पादुकांसमवेत गुरुपुजनाचा, उपासक दिक्षेचा, प्रवचनाचा व दर्शनाचा लाभ उपस्थित भक्तांना व हितचिंतकांना मिळणार आहे, तसेच यादिवशी कार्यक्रम ठिकाणी हजारो हितचिंतक भक्त/उपासक दीक्षा घेणार आहेत. या पादुका दर्शन सोहळ्यानिमित्ताने प्रवचनाच्या माध्यमातून अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहार यांची सांगड घालून सुखी जीवन कसे जगता येईल, मानवी मनाचा विकास कसा साध्य होईल, तसेच भारतीय संस्कृतीचे जतन यावर उद्बोधक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या महामंगल समयी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून, गुरुपुजनचा, प्रवचनाचा व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्व-स्वरूप संप्रदाय, जिल्हा सेवा समिती उत्तर रायगड यांनी केले आहे.



**पनवेल : तालुक्यातील खारकोपर येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त आगरी रिक्षा संघटनेतर्फे गुरुवारी सत्यनारायण महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तेथे भेट देत दर्शन घेतले. या वेळी न्हावा शेवा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मुजावर, किशोर पाटील, बी. टी. तांबडे गुरुजी, स्थानिक प्रकल्पग्रस्त आगरी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष राजीव घरत, उपाध्यक्ष मधुकर पाटील आदी उपस्थित होते.**




# उल्हास नदीतील भिंतीवरून कर्जतमध्ये भाजप आक्रमक

## चार गावांमध्ये पाणी शिरणार; शेतीमध्येही पाणी घुसून नुकसानीची शक्यता; भिंत तोडण्याची निवेदनाद्वारे मागणी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील तमनाथ आडिवली येथे उल्हास नदीच्या पात्रात ३०० मीटर लांबीची सिमेंट भिंत बांधून नदीमध्ये मातीचा भराव केला जात आहे. त्याबद्दल भाजपने नदीच्या पलिकडे असलेल्या चार गावांमध्ये पावसाचे पाणी शिरून पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तवली आहे. नदीमध्ये बांधण्यात आलेली ही भिंत तोडून टाकण्याची मागणी केली आहे.

नदीपात्रातील अतिक्रमणामुळे शेतीचे नुकसान होणार असल्याबद्दल आणि नदीच्या पलिकडे असलेल्या गावात पावसाळ्यात पाणी घुसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. आडिवली येथे धनदांडग्यांनी नदीपत्रात भराव करून काँक्रीटची भिंत आणि घरे बांधत आहेत. याबाबत तक्रार घेऊन शेतकरी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांना भेटले. शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल घेऊन भाजप किसान मोर्चाचे प्रमुख पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांची भेट घेतली. नदीपात्रातील बांधकाम आणि भराव हे सीआरझेड नियम आणि पूरनियंत्रण नियमावली धाब्यावर बसवून काम सुरू असल्याचे सकृतदर्शनी दिसत असल्याचा आरोप निवेदनात केला आहे. या बांधकामामुळे अडिवली, बीड, आवळस, नेवाळी, शिरशे गावाला पुराचा धोका वाढणार आहे. शेती, घरांचे नुकसान तर होईलच परंतु जीवितहानीसुद्धा होऊ शकते. त्यामुळे याबाबत त्वरित कारवाई करण्याची मागणी होत आहे.

या वेळी भाजप किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, सरचिटणीस जनार्दन म्हसकर, तालुकाध्यक्ष शिरीष कदम, युवा मोर्चा शहराध्यक्ष सर्वेश गोगटे, सरचिटणीस प्रियांश जैन, उपाध्यक्ष राज यादव, राहुल यादव, मिलिंद भोईर आणि शहर सरचिटणीस सूर्यकांत गुप्ता उपस्थित होते.

# खोपोलीत नैसर्गिक शेतीविषयी मार्गदर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती योजनेविषयी शेतकरी वर्गास माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी येथील सभागृहात मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.

सेंद्रिय शेतीविषयी शेतकरी वर्गास मार्गदर्शन करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र बारामती येथील शास्त्रज्ञ डॉ. संदीप कांबळे यांनी नैसगिक शेती बिजामृत, दशपर्णी अर्क, कंपोस्ट खत, अंडा टॉनिक, रोग व किडीवरचे नियंत्रण या विषयांवर मार्गदर्शन केले, तसेच तालुका कृषी अधिकारी खालापूर सुनील निंबाळकर यांनी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेची माहिती सांगितली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी पर्यवेक्षक धुमाळ यांनी केले. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेविषयीची माहिती व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आत्मा बीटीएम प्रज्ञा पाटील यांनी केले. प्रशिक्षणाचे नियोजन कृषी सहाय्यक आर. बी. आंधळे यांनी केले. या वेळी तांबाटी सरपंच अविनाशा आमले, कृषी सहाय्यक नितीन रांजून तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.



# मत्स्यगंधा एक्स्प्रेसमध्ये दागिन्यांची चोरी

**पेण** : कोकण रेल्वेच्या मत्सगंधा एक्सप्रेसमध्ये सहा लाख ४० हजार रुपये किमतीच्या दागिन्यांची चोरी झाल्याप्रकरणी फिर्यादी (रा. आदई व्हिलेज, पनवेल) यांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.




फिर्यादी हे मंगळवारी दुपारी मत्स्यगंधा एक्स्प्रेसमधून प्रवास करीत असताना पेण रेल्वे स्टेशनदरम्यान फिर्यादींच्या पर्समधील एकूण सहा लाख ४० हजारांचे सोन्या- चांदीचे दागिने अज्ञाताने फिर्यादी चोरून नेले. याबाबत पेण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

# पेन्शन अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

निवृत्तीवेतन प्रकरणे व भविष्यनिर्वाह निधी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी पेन्शन अदालतीचे आयोजन ५ मार्च रोजी जिल्हा नियोजन समिती कार्यालय येथे करण्यात आले आहे. प्रथम सत्रात सकाळी १०.३० आहरण व संवितरण अधिकारी यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित केलेली आहे व दुपारी ३ वाजता निवृत्ती वेतनधारकांसाठी पेन्शन अदालत आयोजित करण्यात आलेली आहे.


## Loss of Original Documents

This is to inform that I am a Owner of the Shree OM Tube inds. Plot No. 1543 Road No. 17 Steel Market Kalamboli Navi Mumbai and the original documents of this shop fell somewhere in train Down Belapur Local started traveling from Sandhust Road Railway Station and went missing. FIR Logged at Panvel Railway police station, Registration no. 0003 /2024 dt. 27/02/2024. Any body having any objections to issuances of duplicate documents in lieu of the above, may please write to the Shree OM Tube inds Plot No. 1543 Road No. 17 Steel Market Kalamboli Navi Mumbai

**Narayan Singh J. Deval Mo.No-7506086345**

## Loss of Original Documents

This is to inform that I am a Owner of the metelax Tube Inds Plot No. 1543-A Road No. 17 Steel Market Kalamboli Navi Mumbai and the original documents of this shop fell somewhere in train Down Belapur Local started traveling from Sandhust Road Railway Station and went missing. FIR Logged at Panvel Railway police station, Registration no. 0003 /2024 dt. 27/02/2024. Any body having any objections to issuances of duplicate documents in lieu of the above, may please write to the Metelax Tube Inds Plot No. 1543-A Road No. 17 Steel Market Kalamboli Navi Mumbai

**Ishwar Singh J. Deval Mo.No-7506086345**

## महावितरण — ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-१५१, टी-१५२, टी-१५३, टी-१५४, टी-१५५, टी-१५६, टी-१५७, टी-१५८, टी-१५९, टी-१६०, टी-१६१, टी-१६२ आणि टी-१६३/(२०२३-२४) अशा एकुण तेरा निवीदा महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या **e-Tender** च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी दि. ०२.०३.२०२४ पासून ते दि. १०.०३.२०२४ पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख दि. ११.०३.२०२४ ला दुपारी १.०० वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)
**कार्यकारी अभियंता (स्था.)**
**स्थापत्य विभाग, भांडुप**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधीतास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकतीबाबत खरेदीचा व विकसनाचा व्यवहार तीचे मालक १) श्री अरूण शांताराम पाटील, २) श्री मेघश्याम शांताराम पाटील, ३) श्री विजय शांताराम पाटील व ४) श्रीमती सुहासिनी नंदकुमार नागवेकर, मौजे-अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड, यांचेबरोबर ठरविलेले आहे.

**खरेदी करणार असलेल्या मिळकतीचे वर्णन**
**मौजे - अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड, येथील खालील जमीन मिळकत**

| गट क. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १३५/१ | ०.१५.९० | २०.२५ |

**विकसना करीता घेणार असलेल्या मिळकतीचे वर्णन**
**मौजे - अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड, येथील खालील जमीन मिळकत**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १३७ | ०.५९.९० | १०.०६ |

वरील मिळकतीशी अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिदध् झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून व कोणत्याही इसमाचे हक्क असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजले जाईल आणि आमचे अशिल विक्रिचा व विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

नवी मुंबई
दिनांक -१/०३/२०२४

सही/-
**ॲड. नवीन वी. धोंगडी**

**पत्र व्यवहाराचा पत्ता -** फ्लॅट नंबर डी-४०१, ग्रिनस्केप रॉयल को. ऑप. हौ.सो., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस काळविण्यात येत आहे की, माझे पक्षकार भूखंड क्रमांक ०५, सेक्टर -०९, उलवे नोडचे **मालक श्री. विलास मदनलाल कोठारी प्रोप्रा. मे. निल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, राहणार/कार्यालय पत्ता, भूखंड क्र. २१, पी. एम. रोड, नवीन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२१०,** नवी मुंबई हे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या भूखंडाचे मालक आहेत.

**भूखंडाचे वर्णन**

| नोड | भूखंड क्रमांक | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. | सिडको संचिका क्रमांक |
|---|---|---|---|---|
| उलवे | ०५ | ०९ | २६९९.६२ चौ.मी. | |

तरी वर वर्णन केलेला भूखंड **नील रोजालीया सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (नियोजित ) पत्ता :- भूखंड क्रमांक ०५, सेक्टर - ०९, उलवे, नवी मुंबई** यांच्या नांवे हस्तांतरण करण्यासाठी. **मा. व्यवस्थापक (शहर सेवा), (वसाहत अधिकारी १२.५%) सिडको भवन, पहिला माळा, सी.बी.डी. बेलापूर, जि. ठाणे, नवी मुंबई** येथे अर्ज केला आहे.

तरी वर वर्णन केलेल्या भूखंडाबाबत कोणा व्यक्ती, इसम, कंपनी, अथवा कोणाचेही दान, गहाण, तारण, लिज चार्ज, बक्षीस अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार , हितसंबंध, बोजा वा हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदपत्रे पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात मला माझे वरील पत्त्यावर अथवा **मा. व्यवस्थापक (शहर सेवा), (वसाहत अधिकारी १२.५%) सिडको भवन , पहिला माळा, सी.बी.डी. बेलापूर, जि. ठाणे, नवी मुंबई** येथे प्रत्यक्ष भेटून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने आपली हरकत पाठवून खात्री करून घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडून कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत न मिळाल्यास सदरचा भूखंड पूर्णपणे निर्वेध, नि-जोखिम आहे असे समजून सदरचा भूखंड **नील रोजालीया सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (नियोजित ) पत्ता :- भूखंड क्रमांक ०५, सेक्टर -०९, उलवे, नवी मुंबई** नांवे हस्तांतरीत करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०१/०३/२०२४
ठिकाण :- उलवे, नवी मुंबई

सही/-
**निर्मला एस. साळुंखे**
(बी.ए.एल.एल.बी.)
ॲडव्होकेट हाय कोर्ट

शॉप नं.५, प्लॉट नं.४, कल्पवृक्ष सोसा. लि.,सेक्टर ९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.) ४१०२०६.


## दैनिक रामप्रहर

### वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन

(सेंट्रल रूल्स, १९५६ नियम ८ अन्वये)

**प्रकाशन स्थळ :** अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित
**प्रकाशनाचे कालमान :** दैनिक
**मुद्रकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.
**प्रकाशकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.
**संपादकाचे नांव :** देवदास लक्ष्मण मटाले
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** टॉवर ५, फ्लॅट नं. ६४, गोदरेज गार्डन इन्क्लेव्ह, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०७९

मी **कृष्णा चांगू ठाकूर** याद्वारे असे जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

दि. ०२ मार्च २०२४

सही/-
**कृष्णा चांगू ठाकूर**
**(प्रकाशकाची सही)**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. अनंता हिरु पाटील व इतर** यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमिन **१) श्री. केयुर किरीट भयानी व इतर** यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालक यांनी दिलेल्या सहमतीने सदरची पेपर नोटीस देण्यात येत आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - विहीघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. /हिस्सा नं. | भुधारणा पध्दती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ६६/१ | वर्ग-२ | ०-३६-७०<br>पो.ख. ०-०४-००<br>**एकूण ०-४०-७०** | ३.५० |
| १३२ | वर्ग-२ | ०-६९-५०<br>पो.ख. ०-०२-८०<br>**एकूण ०-७२-३०** | १०.३१ |
| ६७ | वर्ग-१ | ०-०९-७०<br>पो.ख. ०-००-२०<br>**एकूण ०-०९-९०** | १.३७ |
| १००/८ | वर्ग-१ | ०-२०-२० | २.१२ |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबेकब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांने दिल्यावरुन वरील खरेदीदारांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकती बाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटनेस मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तिंना सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकती निर्वेध आहे असे समजून वरील खरेदीदार सदर व्यवहार पुर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांक : ०२/०३/२०२४

सही/-
**श्री. केयुर किरीट भयानी**
राहणार गिरीराज हॉरिजन,
फ्लॅट नं. बी-१४०४, प्लॉट नं. ४३ए/बी,
सेक्टर २०, खारघर, नवी मुंबई,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१०.
मो.नं.९८२०५५५०७३/९८६७६८६९०२

## वाहने विक्री जाहीर लिलाव सूचना

**महात्मा फुले को. ऑप. क्रेडीट सो.लि.,** यांनी कसुरवार कर्जदारांच्या विरूध्द वसुली प्रक्रीया सुरू केली आहे संस्थेच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांनी संबंधित कर्जदारांना अनेक सुचना देऊन देखील कर्जदारांनी त्याकडे दुर्लक्ष करून दिलेल्या कालावधीमध्ये थकबाकी रक्कमेचे भरणा करण्यास कसुरवार ठरले आहेत म्हणून संस्थेच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांनी तारण वाहनांचा कब्जा घेतला आहे. महात्मा फुले को. ऑप. क्रेडीट सो.लि., पनवेल शाखा यांच्याकडून खालील नमुद केलेल्या वाहनांची जाहीर लिलावाव्दारे विक्री करून थकीत कर्ज रकमेची वसुली करण्याकरिता खाली नमूद वाहनांचा जाहीर लिलाव ''**जसे आहे तसे**'' या पध्दतीने विक्री करण्याचे ठरले आहे.

| अ. क्र. | कर्जदारांचे नाव | वाहन | रिक्षा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मेहबूब मोहमद आलमेल | बजाज ऑटो रिक्षा | MH46 AZ 0654 |
| २ | मनोज अशोक पवार | बजाज ऑटो रिक्षा | MH46 AZ 1421 |
| ३ | नवनाथ रामदास विधाते | बजाज ऑटो रिक्षा | MH46 AZ 0968 |
| ४ | ईसा शब्बीर पटेल | बजाज ऑटो रिक्षा | MH46 AZ 4533 |

**लिलावाचे ठिकाण :** बाबा फार्म हाऊस, अदाई गाव, पनवेल - ४१०२०६
**लिलावाची तारीख व वेळ :** २०/०३/२०२४ वेळ ११:०० वाजता

**टीप :**
१. संस्थेस कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि लिलाव रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवला आहे.
२. लिलाव हा संस्थेच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांव्दारे अंतिम करण्यात येईल.
३. सदर प्रकाशन हे नमुद कर्ज खात्याचे कर्जदार यांना १५ दिवसांची सूचना असेल.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- १/०३/२०२४

सही/-
**श्री. विजय लक्ष्मण कांबळे**
(विशेष वसुली अधिकारी)
महात्मा फुले को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,
मुख्य कार्यालयः ३, जेरबाई वाडीया बाग, डॉ. आंबेडकर रोड, भायखळा, मुंबई - २७

## MAHATRANSCO — SRM E –TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-01/2024-25 Dtd.02.03.2024 RFX No. 7000030316 | Sub:- Invitation of SRM E-Tender for providing 01 No. Outsourced Steno (Skilled), 01 No. outsourced Typist (Skilled), 3 no. of outsourced LDC F&A/HR (Skilled) & 04 nos. of outsourced Peon (unskilled) at EHV (O&M) Dn. Mahad under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25. | **Rs. 2529894.24 /- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 25,299/-whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 02.03.2024 @ 00:00 hrs to 10.03.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**~Sd~**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn., Mahad**

## कुळगांव बदलापूर नगर परिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३.
ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

संदर्भ : कुबनप/आरोग्य/६२९/२०२३-२४ दिनांक :- ०१/०३/२०२४

### जाहीर निविदा सूचना क्र. १/२०२३-२४

कुळगांव-बदलापूर नगर परिषद, जिल्हा-ठाणे यांजकडून खालील कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुळगाव बदलापूर नगर परिषदेस फिरते शौचालय पुरवणे. | रु. ९९८०००/- | रु.१००००/- | रु. १०००/- | १ महिना |

**सदर निविदेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.**
१) निविदा संच विक्री ठिकाण - आरोग्य विभाग (निविदा विक्री व इसारा रक्कम) दिनांक - ०२/०३/२०२४ ते दिनांक - ११ /०३ /२०२४ (सुट्टीचे दिवस वगळून )
२) निविदा धारकांनी निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक -११/०३/२०२४
३) मा. मुख्याधिकारी कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे कार्यालयात दिनांक -१२/०३/२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत शक्य झाल्यास निविदा उघडण्यात येईल.

**निविदा फॉर्म प्राप्त करण्याच्या व भरण्याच्या अति व शर्ती खाली नमूद केल्याप्रमाणे राहतील.**
अ) महाराष्ट्र शासनाचे सक्षम खात्याचे नोंदणी प्रमाणपत्र नोंदणी ठेकेदार
ब ) आयकर विवरणपत्र व GST प्रमाणपत्र.
क) उपरोक्त कामाकरिता निविदा सादर करताना सर्व करासहित निविदा भरावी. तसेच नगरपरिषद सांगेल त्या ठिकाणी स्व:खर्चाने फिरते शौचालय पोहच करणेचे आहे. त्यासाठी वेगळा वाहातुक खर्च दिला जाणार नाही.
ड) शपथपत्र ५०० रु च्या स्टॅम्प पेपरवर करून देनेचा आहे.
इ) निविदा संदर्भात सदस्यशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे परिशिष्ट अ प्रमाणे प्रतिज्ञापत्र

**४) वित्तीय बोलीचा लिफाफा क्रमांक २**
अ) मूळ प्रतीतील दरपत्रक
५) प्राप्त निविदा स्वीकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
६) सदर निविदेबाबत काही शंका असल्यास आरोग्य विभाग कुबनप संपर्क करावा.
७) सदर फिरते शौचालयबाबत तांत्रिक बाबीची माहिती आरोग्य विभागाकडून करून घेतल्यानंतरच निविदापत्रक सादर करणेचे आहे.

सही/-
**(योगेश गोडसे)**
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगाव

निवडक

## केबीपी कॉलेजमध्ये मराठी भाषा दिन



**नवी मुंबई** : रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये साहित्यमंच समितीच्या वतीने शुक्रवारी (दि.१) मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य डॉ. अजित मगदूम, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्रगीताने करण्यात आली. प्रमुख पाहुणे डॉ. अजित मगदूम यांनी मराठी भाषा सुंदरता व वास्तव यावर व्याख्यान दिले. डॉ. मगदूम यांनी वि. वा. शिरवाडकर यांच्या साहित्याची गुणात्मकता व उत्कृष्टता मांडली. या वेळी साहित्यमंच समितीने आयोजित केलेल्या काव्यलेखन स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. ओमकार धुळप आणि दिव्या ठाकूर यांनी महाराष्ट्रगीत सादर केले. प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनातून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.आबासाहेब सरवदे आभार प्रा. ज्योती खैरे यांनी तर व्यवस्थापन प्रा. पूनम रावले यांनी केले.

## मनपा शिष्यवृत्तीसाठी मुदतवाढ

**नवी मुंबई** : महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध घटकांसाठी शिष्यवृत्ती योजना राबवण्यात आली आहे. यासाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १५ मार्चपर्यंत आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मान्यतेने वाढवण्यात आली आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ यांनी दिली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इ. पहिली ते महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती दरवर्षी देण्यात येते. मागील वर्षीपासून ऑनलाईन पद्धतीने ही योजना राबवण्यात येत आहे. या योजनांची माहिती www.schemenmmc.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे. शिष्यवृत्ती योजनेसाठी ८ ते २८ फेब्रुवारीपर्यंत विहीत नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने अर्ज वरील संकेतस्थळावर स्विकारण्याची मुदत देण्यात आली होती, मात्र अनेक संस्था, लोकप्रतिनिधींनी ही मुदत वाढवावी अशी मागणी आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे केली होती. त्यानुसार मुदतवाढ करण्यात आली आहे.

## हातभट्टीची दारू बाळगल्याने कारवाई

**पनवेल** : गावठी हातभट्टीची दारू बेकायदेशीररित्या जवळ बाळगल्याबद्दल एक महिलेवर पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. बेरलेवाडी येथे एक महिला बेयकायदेशीररित्या गावठी हातभट्टीची दारू जवळ बाळगत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांना मिळताच त्यांच्या मार्गदशनाखाली सपोनि. सचिन पाटील, विवेक भोईर, हवालदार विजय मासाळ, प्रकाश थोरात आदींच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकून महिलेकडून १५०० रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारू हस्तगत करून तिच्याविरोधात महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ६५ (ई)प्रमाणे कारवाई केली आहे.

# पनवेल मनपातर्फे बचत गटांना प्रशिक्षण

## 'अमृत मित्र' अंतर्गत उपक्रम; महिलांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासनाच्या अमृत कार्यक्रम व दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान यांच्या कृतीसंगमांर्गत अमृत मित्र उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पहिले प्रशिक्षण पनवेल महापालिकेच्या वतीने गुरुवारी (दि. २९) मुख्यालयात आयोजित करण्यात आले.



या प्रशिक्षणाचे उद्घाटन आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपअभियंता विलास चव्हाण, सिन्नर नगर परिषदेचे शहर अभियान व्यवस्थापक अनिल जाधव, सी-डब्ल्यूएएस प्रशिक्षण संस्थेचे प्रतिनिधी मुख्यालयात उपस्थित होते, तसेच ऑनलाईन पद्धतीने दीनदयाळ अंत्योदय योजनेचे राज्य अभियान व्यवस्थापक प्रसाद राजेभोसले, १९ महापालिकेच्या बचत गटाचे सदस्य उपस्थित होते.

आयुक्त गणेश देशमुख म्हणाले, बचत गटाच्या माध्यमातून महिला आपला उद्योग, व्यवसाय उभारून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करीत आहेत. बचत गटाच्या माध्यमातून कष्ट घेत महिला केवळ चूल आणि मूल ऐवढ्यापुरत्या मर्यादित न राहता राष्ट्र निर्माणच्या कामामध्ये सहभागी होत आहेत. शासनाच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना स्वत:चा उद्योग व्यवसाय वाढविण्यासाठीचे हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.

या अमृत मित्र उपक्रमांतर्गत प्रथम टप्प्यामध्ये केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे राज्यातील १९ शहरांची निवड करण्यात आलेली आहे.

यामध्ये निवड करण्यात आलेल्या विविध प्रकल्पांच्या आधारे बचत गटातील महिलांना प्रशिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने प्रशिक्षणासाठी सी-डब्ल्यूएएस संस्था मदत करणार आहे. या उपक्रमांतर्गत पहिले प्रशिक्षण पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून देण्यात आले.

संस्थेच्या माध्यमातून उद्यान व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये उद्यानातील रोपांच्या निवडीपासून ते वृक्षछाटणी, गवत कापणी, त्यासाठी लागणारी यंत्रे, खतांची मात्रा, सेंद्रिय खतांची निर्मिती अशा विविध घटकांवर मार्गदर्शन करण्यात आले, तसेच यानंतर ग्राहकांना पुरवठा होणाऱ्या नळाच्या पाण्याची गुणवत्ता तपासणीच्या विविध चाचण्यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

## एसआयईएस कॉलेजमध्ये फेस्टीवल उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

एसआयईएस कॉलेज, नेरूळ संकुलात वाणिज्य विभागात फेस्ट मोठ्या दिमाखात साजरा झाला. या वर्षीची थीम होती इराया: फॉर्च्युन फेव्होर्स द ब्रेव्ह. सकाळी ९ वाजता स्वागत भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन झाले आणि दोन नर्तकांनी भरतनाट्यम सादर करून प्रेक्षकांसाठी आपली उत्कृष्ट प्रतिभा दाखवली.

ट्रेझर हंट, युनो फिएस्टा, मार्केटिंग विझार्ड्स, झटका जंक्शन इत्यादी उपक्रम करण्यात आले होते. ओले आणि आनंद हे कार्यक्रमाचे प्रायोजक होते. काही मान्यवरांनी त्यांच्या मधुर आवाजाचे प्रदर्शन केले आणि त्यानंतर सर्व जाहिरातींची नक्कल करणारे व्यक्तिमत्त्व आणि प्रत्येकाच्या मनात नॉस्टॅल्जियाची भावना आणली. सुमित आणि पायस्को यांनी त्यांच्या रॅप सादर केले. शिवम चौहानच्या आवाजात प्रत्येक जण हरवून गेला. शेवटी गायकाने सही केल्यावर आणि कोअर टीमच्या अंतिम गायनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## १६ कोटींच्या सुपारी, मिरीची चोरी

### पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

कस्टम ड्युटी चुकवून जेएनपीटी बंदरात आयात करण्यात आलेली व कस्टम विभागाने पुढील कारवाईसाठी ताब्यात घेऊन पनवेलच्या शिरढोण येथील गोदामामध्ये ठेवलेली तब्बल १६ कोटी सहा लाख रुपये किमतीची सुपारी व मिरी या मालाची चोरी झाल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात पनवेल शहर पोलिसांनी कस्टम विभागाने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.

२०२२मध्ये अल्फा इंडस्ट्रीज, हायलॅन्ड इंटरनॅशनल आणि फ्युचर फस्ट इंटरनॅशनल या तीन कंपन्यांनी परदेशातून कस्टम ड्युटी चुकवून कोट्यवधी रुपये किमतीची सुपारी व मिरी या मालाची आयात केली होती. डिसेंबर २०२२मध्ये जेएनपीटी बंदरात हा माल आल्यानंतर कस्टम ड्युटी भरल्यामुळे कस्टम विभागाने या तिन्ही कंपन्यांचा माल जप्त करून पनवेलच्या शिरढोण येथील आशेरा वेअरहाऊस अँड पार्कमधील वेगवेगळ्या गाळ्यांमध्ये ठेवला होता, मात्र या मालाची चोरी होत असल्याची माहिती डायरोक्टरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स (डीआरआय)च्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यामुळे डिसेंबर २०२२मध्ये कस्टमच्या अधिकाऱ्यांनी या गाळ्यामध्ये जाऊन मालाची तपासणी केली असता, तेथे अल्फा इंडस्ट्रीज या कंपनीची सहा कोटी ३३ लाख रुपये किमतीची १२८ मेट्रिक टन मिरी चोरून नेण्यात आल्याचे आढळले. त्यामुळे कस्टम विभागाने हा माल सील करून त्याच ठिकाणी ऑलसन शिपिंग अँड लॉजिस्टिक्सच्या गाळ्यामध्ये ठेवला होता.

याच गाळ्यामध्ये ठेवण्यात आलेला अन्य कंपन्यांचा मालही चोरून नेण्यात येत असल्याची माहिती ऑगस्ट २०२३मध्ये डीआरआयच्या पथकाला मिळाली होती. त्यामुळे कस्टम विभाग, डीआरआय व सीआययू आणि ऑडिट सेक्शन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण मालाची तपासणी केली.

या वेळी भिंतीला भगदाड पाडून त्यातून मालाची चोरी केल्याचे आल्याचे आढळले. कस्टम विभागाने या मालाच्या चोरीबाबत अधिक तपास केला असता, त्यांना अधिक तपासात तेथील काही व्यक्तीनी संगनमत करून कस्टमच्या ताब्यात असलेल्या १६ कोटी सहा लाख किमतीची सुपारी व मिरी चोरून नेल्याचे आढळून आले आहे.

## विद्याभवनच्या विद्यार्थ्यांची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या विद्याभवन शिक्षण संकुलात मराठी माध्यमाच्या इ. आठवीतील आर्यन सचिन बोराडे आणि इंग्रजी माध्यमातील इ. आठवीतील लेखा वैभव पाटील या विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण विज्ञान संकल्पनांची भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड करण्यात आली.



आर्यन बोराडे याने दिव्यांग तसेच सामान्य रुग्णांसाठी मल्टीटास्किंग चेअरची संकल्पना तर लेखा पाटील हिने शेतीत पाणी बचत करण्यासाठी ठिंबक सिंचनाची संकल्पना सादर केली. हे प्रकल्प जिल्हा पातळीवरील प्रदर्शनात सादर करण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रत्येकी दहा हजार रुपये बँक अकाऊंटमध्ये जमा करण्यात आले आहेत. दत्तात्रय आटपाडकर आणि पौर्णिमा खरजे या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पुणे विद्यार्थीगृह संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, कार्यवाह संजय गुंजाळ कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष कृष्णाजी शिरकांडे व संचालक मंडळ तसेच मुख्याध्यापक गोरख कदम, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, राजकुमारी इंदलकर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, डी. टी. पिंजारी, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर, सर्व विद्यार्थी आणि पालकांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**पणजी** : भारतीय पोर्ट अॅण्ड डॉक मजदूर महासंघाच्या वतीने महामंत्री सुरेश पाटील व कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी गोवा पोर्टचे चेअरमन डॉ. विनोद कुमार यांची भेट घेतली.

## तळोजात हत्याराने एकावर हल्ला

**पनवेल** : चिकनचे पैसे नंतर देतो असे बोलल्याने राग आला आणि चिकन कापण्याच्या हत्याराने उजव्या हातावर मारून जखम केल्याने आरोपी नफिस खान याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मोहम्मद जोहेब युनिस खान हा तळोजा फेज २ येथे राहत असून त्याच्या दुकानाच्या बाजूला नफीस खानचा चिकन विक्रीचा व्यवसाय आहे. त्याने नफिस खानकडून १०० रुपयांचा कलेजी पेठा घेतला होता. त्याचे पैसे देणे बाकी होते. मोहम्मद चिकन विक्रीचा दुकान बंद करून जात असताना नफिस खान याने पैशांची मागणी केली. त्याने नंतर पैसे देतो, असे बोलण्याचा राग आल्याने नफिस याने सत्तुरने हातावर जखम केली.



**पनवेल** : कामोठे येथील दि.बा.पाटील हायस्कूलमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना माजी नगरसेवक अरुणकुमार भगत यांनी परीक्षेसाठी गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या.







**पनवेल : गोरगरीब, कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या जयंतीनिमित्त शेलघर येथे त्यांचे पुत्र संजय भगत, भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे आणि पत्रकार माधव पाटील यांनी विचार प्रकट केले. या वेळी भगतसाहेबांचे चाहते, नागरिक उपस्थित होते.**

## नवीन पोसरीत गजानन महाराज प्रकट दिन सोहळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा नवीन पोसरी येथे श्री गजानन महाराज प्रकटदिन सोहळा रविवारी (दि.३) आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

पहाटे ४ ते ७ वाजता भुपाळी व काकड आरती, श्री गजानन विजय पोथीचे पारायण, ७ वाजता श्रींचे लघूरूद्र अभिषेक स्नान, दुपारी १२ वाजता श्रींची आरती, दुपारी ३ ते ७ वाजता पालखी मिरवणूक, सायंकाळी ७ ते ७:३० वाजता श्रींची आरती, सायंकाळी ७:३० ते ९ वाजता महाप्रसाद, रात्री ९ ते ११ वाजता कीर्तन सेवा हभप प्रविण महाराज फराट (इंजिवली) यांचे सुश्राव्य कीर्तन होईल. भक्तांनी आशीर्वाद घ्यावा, असे आवाहन सिताराम माळी यांनी केले आहे.

## गव्हाण विद्यालयात विज्ञान दिन साजरा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम इ. सातवी ब वर्गशिक्षक डी. के. म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना घेऊन नियोजन केले.

या वेळी डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपप्राचार्य पी. बी. मंडले तसेच लाईफ मेंबर आर. एस. भोईर, गुरुकुल विभाग प्रमुख एस. के. भोईर तसेच सर्व विज्ञान शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यश राठोड याने केले. सर्व विज्ञान शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. शिवजयंतीच्या दिवशी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रोख पाच हजार रुपये बक्षीस मिळविलेल्या इ. सहावीमधील विद्यार्थी स्मित कुंदन मोकल याचाही सत्कार करण्यात आला. विज्ञान शिक्षक आर. एस. भोईर यांनी विद्यार्थ्यांना प्रश्नमंजुषेद्वारे विज्ञानाची गोडी आणि विज्ञानाचे आपल्या जीवनातील अविभाज्य स्थान कसे असते, हे समजावून सांगितले.

सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. आर. पाटील यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक सांगितला. अंधश्रद्धेवर आधारित दोन गीतांचे सादरीकरण केले. याज्ञिक मोकल, यज्ञ मोकल, स्मित म्हात्रे, भक्ती ठाकूर, जीविका पाटील, दृष्टी ठाकूर आणि इतर विद्यार्थ्यांनी त्यांना साथ दिली.



# काशिद येथील जेट्टीचे काम प्रगतिपथावर



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशिद येथे जेट्टी उभारण्याच्या कामाला आता वेग आला आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा निर्धार केला आहे. सध्या हे काम जोरात सुरु असून जेसीबी व डंपरच्या सहाय्याने मोठ मोठ्या दगडाचे भराव करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे मेअखेर किमान ६० टक्के काम पूर्ण होईल अशी अपेक्षा येथे व्यक्त करण्यात येत आहे.

काशिद अत्याधुनिक जेट्टी बांधण्यासाठी राज्य शासनाकडून २३ जानेवारी २०१९ रोजी शासकीय आदेश काढून ११२.४६ कोटी रुपये मंजूर करून या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, मात्र कोरोना प्रादुर्भावामुळे या जेट्टीचे काम रेंगाळलेले होते. हे काम काही वर्ष बंद होते. सन २०२२मध्ये काम पुन्हा सुरु करण्यात आले, पण या कामाचा वेग अतिशय मंद होता. त्यामुळे या जेट्टीचे काम पूर्ण कधी होणार हा प्रश्न येथील स्थानिक नागरिकांना पडला होता, परंतु आता महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाने पुन्हा एकदा कंबर कसली असून आहे.

काशिद हे पर्यटकांचे आवडते ठिकाण असून येथे दरवर्षी सात लाखांपेक्षा जास्त पर्यटक येत असतात. मुंबई येथून येणाऱ्या पर्यटकांना तेथून समुद्रमार्गे अलिबाग मांडवा येथे यावे लागते. मांडवा ते काशिद हे प्रवास अंतर तीन तासांचे आहे. काशिदला येण्यासाठी पर्यटकांना थेट सुविधा मिळावी यासाठी येथे जेट्टीला मंजुरी देण्यात आली. मुंबई ते काशिद जलमार्गाने किमान दोन तासांत गाठता येणार आहे. त्यामुळे पर्यटकांना सोयीचे होईल.

मुंबई भागातील असंख्य पर्यटकांचा जेट्टीमुळे रस्ते प्रवास वाचणार असून पर्यायाने वेळ व पैशांची बचत होईल. ही जेट्टी दुहेरी हेतू ठेवून बांधण्यात येत आहे. काशिद येथील जेट्टीवरून प्रवासी वाहतूक व रो-रो सेवासुद्धा सुरू करून असंख्य पर्यटकांचा लोंढा मुरूडकडे आकर्षित करता येणार आहे.

■ सन २०१९मध्ये केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेंतर्गत केंद्राची ५० टक्के रक्कम व राज्य शासनाच्या मेरीटाइम बोर्डाची ५० टक्के रक्कम मिळून काशिद जेट्टी विकसित करण्याचे ठरले. यासाठी तसा शासकीय अध्यादेशसुद्धा निघाला होता.त्याप्रमाणे हे काम सुरू झाले, पण अनेक वर्ष रेंगाळत राहिले होते, परंतु सध्या या कामाने वेग घेतला असून लवकर काम पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

■ प्रवासी जेट्टी व रो-रो सेवा यासाठी ६२ बाय १२ मीटर कामाकरिता तीन कोटी ४५ लाख ४३ हजार ४४८ रुपये प्रास्तावित खर्च मंजूर आहे. पर्यटकांची वाहने वाहनतळावर पार्क करण्यासाठी २४० बाय ८० मीटर बांधकामासाठी सहा कोटी ८१ लाख ३० हजार १३३ रुपयांचा आराखडा आहे. काशिद जेट्टीवर येण्या जाण्यासाठी असणारा ६०० मीटरपेक्षा संलग्न रस्ता तयार करण्यास सात कोटी तीन लाख ६३ हजार २२५ रुपये मंजूर झालेले आहेत.

■ महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाच्या अधिकारी व कर्मचारीवर्गास टर्मिनल इमारतीसाठी एक कोटी आठ लाख ६१ हजार ९७६ रुपये मंजूर आहेत. याशिवाय पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी ब्रेक वॉटर बंधारा निर्माण करण्यास ७६० एम लॉन्ग बंधारा निर्मितीकरिता ७३ कोटी ४९ लाख ८५ हजार ६७८ रुपये मंजूर आहेत.

# अलिबाग प्रेस असोसिएशनचे तेजस्विनी पुरस्कार जाहीर



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग प्रेस असासिएशनतर्फे देण्यात येणारे तेजस्विनी पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. चंद्रकला कुमार कदम, सुवर्णा गणेश खाड्ये, जान्हवी विनोद पाटील, सोनाली राजेंद्र तेटगुरे आणि तनिषा मंदार वर्तक यांची सन २०२४च्या तेजस्विनी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या, परंतु प्रसिद्धीपासून दूर असलेल्या कर्तृत्ववान महिलांना अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे दरवर्षी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तेजस्विनी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. गेल्या १६ वर्षांपासून संस्थेच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जातो.

यंदाचा तेजस्विनी पुरस्कार वितरण समारंभ ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या अलिबाग श्रीबाग येथील आदर्श भुवन या मुख्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला अलिबाग येथील रायगड जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, रायगड जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक, अलिबाग नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुखे, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तेजस्विनी पुरस्कार विजेत्या चंद्रकला कदम या नावाजलेल्या चित्रकार आहेत. पोलीस हवालदार सुवर्णा खाड्ये यांनी जिवाची पर्वा न करता दोन अपहरणकर्त्यांना जेरबंद केले आहे. जान्हवी पाटील यांनी सामाजिक क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत सोनाली तेटगुरे यांनी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे, तर धनुर्विद्या क्रीडा प्रकारात तनिषा वर्तक यांनी राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे. या सर्व जणींचे कौतुक होत आहे.

# रामनारायण पत्रकार भवनात कुसुमाग्रज यांना अभिवादन



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघ आणि स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक कला मंच तसेच प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रामनारायण पत्रकार भवनात वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला ज्येष्ठ साहित्यिक रमेश धनावडे आणि रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुळकर्णी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी नागेश कुळकर्णी व ज्येष्ठ साहित्यिक रमेश धनावडे यांनी कुसुमाग्रज यांच्या जीवनावर आधारित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंचचे सदस्य माजी तहसीलदार नयन कर्णिक, माजी नगरसेवक आर.के.घरत प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे, झेबा कुरेशी आदी उपस्थित होते.

# रोह्यातील डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कोलाड गोवे येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालया संस्थेचे विश्वस्त संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान विभाग अंतर्गत २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला.

मंचावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख, उपप्राचार्य नेहल प्रधान, कार्यालयीन अधीक्षक अमोल गोलीपकर, विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा.रेश्मा शेळके, कला विभागाचे प्रमुख डॉ. सतीश सावळे, अजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख डॉ. आमलपुरे सूर्यकांत, वाणिज्य विभागातील प्रा.प्राजक्ता शिंदे, प्रा. पवार अश्विनी, प्रा. पडवळ प्रतीक्षा, विज्ञान विभागातील सलोनी बामुगडे, प्रा. अडलिकार जयवंती, प्रयोगशाळा सहाय्यक सायली मोरे, पाटील स्वप्नाली, ग्रंथपाल करुणा बडे आदी उपस्थित होते.

या वेळी प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख यांनी प्रथमतः सर्वांना विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या व विज्ञान दिन साजरा करण्यामागे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा हाच मुख्य उद्देश आहे. समाजात आज अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात दिसून येते आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने विज्ञानाच्या आधारे ही अंधश्रद्धा कमी करता येते. आजच्या २१व्या शतकात तरुण विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विषयी ज्ञान घेऊन विज्ञानाच्या वाटचालीकडे गेले पाहिजे. भारत चंद्रयानाची चंद्रावरील यशस्वी झेप हे संपूर्ण जगभरातील तरुणवर्गाला एक अविस्मरणीय प्रेरणा आहे. विज्ञानाने मोठी प्रगती केलेली आहे. संपूर्ण जगाची माहिती आपल्याला घरबसल्या काही सेकंदात मिळू शकते हेच विज्ञानाचे कार्य आहे, असे डॉ. देशमुख यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व दीप प्रज्वलन करून झाली. प्रस्ताविकानंतर मंचावरील मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. किर्ती राधाकृष्णन यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाविषयी माहिती सांगितली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दर्शना माळी यांनी व प्रास्ताविक प्रा. रेश्मा शेळके यांनी केले; तर आभार प्रा. जान्हवी म्हस्कर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# मुरूडमध्ये आरोग्य शिबिरास प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

संजिवनी आरोग्य सेवा संस्था मुरूड व कॅन्सर पेशंट अॅड असोसिएशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच आरोग्य शिबिर घेण्यात आले. संजिवनी संस्थेच्या प्रांगणात झालेल्या या आरोग्य शिबिरात फुल बॉडी चेकअप तसेच कॅन्सरचे निदानदेखील करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन डोंगरी येथील श्री स्वामी समर्थ मठाच्या संचालिका त्रिशा पाटील यांच्या हस्ते व डॉ. दत्तात्रेय पाटील यांच्या उपस्थितीत झाले. शिबिरासाठी अनेक स्त्री व पुरुष यांनी गर्दी केली होती. त्रिशा पाटील यांनी आपण आपली आरोग्यविषयक काळजी घेणे अत्यंत जरुरी आहे, असे सांगितले. सर्वांनी वेळोवेळी प्राणायाम व योगासने करावीत असे सांगून त्यांनी अनुलोम-विलोम कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

शिबिरास सिपीएएचे तज्ज्ञ डॉक्टर्स, संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे, खजिनदार कीर्ती शहा व अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. उपक्रम यशस्वी होण्यासाठी आदेश दांडेकर, अशोक विरकुड, चंद्रकांत अपराध, वासंती उमरोटकर, नगमाना खांजादा, दिपाली दिवेकर, अनघा चौलकर, राशीद जनाब, शकिल कडू, तेजश्री प्रधान, डॉ. कोकाटे, राकेश भगत, उल्हास मकू, चंद्रकांत अपराध, अमित कवळे संस्थेचा स्टाफ यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे सेक्रेटरी अजित गुरव यांनी आभार मानले.



# केएमसी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या केएमसी महाविद्यालयात मराठी विभाग भाषा आणि साहित्य मंडळ व अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.

संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, कार्यवाह किशोर पाटील, महाविद्यालय विकास समितीचे उपाध्यक्ष दिलीप पोरवाल, प्राचार्य डॉ.प्रताप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा व साहित्य मंडळाच्या सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे उत्तम आयोजन केले होते.

वर्षभर मराठी विभागाने घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, निबंध लेखन, काव्यवाचन, अभिवाचन, पुस्तक परीक्षण स्पर्धा अशा विविध उपक्रमांमध्ये कौशल्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा या वेळी पुस्तके व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला. प्रथमेश धायगुडे, ऋतिक गवळे, समृद्धी काकडे, माधुरी वाघमारे या विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव दिन व कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाबद्दल मनोगत व्यक्त केले. राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.एम.ए.केसरकर यांच्यातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तम पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रताप पाटील यांनी 'भाषेचे मानवी जीवनील महत्त्व व भाषिक जाणिव आणि भाषा कौशल्य' याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत संवाद साधला. 'आयक्यूएसी'चे समन्वयक डॉ.अमोल नागरगोजे यांनी मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना समर्पक असा विचार दिला. मराठी विभागाचे प्रमुख डॉ.भाऊसाहेब नन्नवरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.ओंकार खंडागळे यांनी संयोजन केले.

या वेळी डॉ.एम.ए.केसरकर, प्रा.जी. पी.मुळीक, डॉ.उत्तम गाढे, प्रा.सुनील वाघमारे, प्रा.नागोराव तारू, डॉ.आर. सी.अंबारे, प्रा.रामदास रुठे, डॉ.मीरा वाघमारे, प्रा.विठ्ठल जाधव हे प्राध्यापक उपस्थित होते. वर्षाराणी गोरी या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या उपक्रमात प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# 'विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आणि सर्जनशील मानसिकता ठेवावी'



**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त चर्चासत्र तसेच पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन नागपूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे सहाय्यक प्राध्यापक अभिजीत राऊत यांच्या हस्ते झाले. या उपक्रमास प्राचार्य डॉ. मोहन काळे, डॉ. अमोल चांदेकर आदी उपस्थित होते.

विज्ञान क्षेत्रात सर सी.व्ही. रामन आणि डॉ.ए.पी.जे कलाम यांचे भारतामध्ये महत्त्वाचे योगदान आहे. विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आणि सर्जनशील मानसिकता ठेवावी. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नवोपक्रमासाठी उपलब्ध विविध सरकारी निधी आणि अनुदान मिळते. त्याचा अभ्यास करून लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. अभिजीत राऊत यांनी या वेळी केले.

डॉ. मोहन काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात, फार्मसीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यास चांगला अनुभव घेता येईल. कोणत्याही तज्ज्ञ मार्गदर्शनाशिवाय औषधे घेणे कधी कधी जीवावर बेतू शकते. भारतातील औषध विज्ञान खूप प्रगत आहे. म्हणूनच केवळ सहा महिन्यांत कोविडची लस आपल्याकडे निर्माण करण्यात आली. त्यामुळे देशभरातील नव्हे तर जगभरातील कोट्यवधी लोकांचे प्राण वाचू शकले, अशी आठवण करून दिली.

पोस्टरचे मूल्यमापन डॉ. प्रदीप वाव्हुळे आणि डॉ. उज्ज्वला थुबे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्फिया खान व प्रणिता भांगरे यांनी केले. या वेळी भाग्यश्री सुर्यवंशी, श्वेता दांगट, स्वाती चुंभळे, डॉ. सतीश पांडव आदी उपस्थित होते.

# ढगाळ वातावरणामुळे शेतकरी धास्तावले

**महाड : प्रतिनिधी**

राज्यात विविध ठिकाणी सातत्याने पडणाऱ्या अवेळी पावसामुळे आंबा आणि काजू उत्पादक धोक्यात आलेले असतानाच पुन्हा एकदा गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे आंबा आणि काजू उत्पादक धास्तावले आहेत. कडधान्य काढण्यासाठी अंतिम टप्प्यात असतानाच ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने शेतकरीही चिंतेत आहेत.

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील विविध भागांत अवकाळी पाऊस पडत आहे. महाड तालुक्यात पाऊस पडत नसला तरी ढगाळ वातावरणामुळे प्रचंड बदल झाला आहे. या बदलामुळे आंबा आणि काजू उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. या वर्षी बऱ्यापैकी आलेला आंब्याचा बहर शेतकऱ्यांना सुखावत होता, मात्र ढगाळ वातावरणामुळे आंब्याचा मोहर गळून पडतो की काय अशी भीती निर्माण झाली आहे. बहुतांश भागात काजू बीदेखील तयार झालेली आहे, मात्र या ढगाळ वातावरणामुळे काजू फळावरही परिणाम जाणवणार आहे.

महाड तालुक्यात काही भागात पाऊस शिंपडून गेल्याने वातावरणात बदल झाला आहे. दिवसभर ढगाळ वातावरण राहिल्याने तालुक्यातील कडधान्य काढणाऱ्या शेतकऱ्यांची तारांबळ उडाली आहे. भातपीक घेतल्यानंतर तालुक्यातील खाडीपट्टा, रायगड विभाग, वरंध, बिरवाडी आदी भागांमध्ये कडधान्य लागवड केली जाते. ढगाळ वातावरणामुळे विविध रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यामुळे समस्त शेतकरीवर्ग चिंताग्रस्त झाल्याचे दिसून येत आहे.

# राहुल 'आऊट', बुमराह 'इन'

## इंग्लंडविरुद्ध पाचव्या कसोटीसाठी भारतीय संघात बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात चालू असलेल्या कसोटी मालिकेतील पाचवा व अंतिम सामना धर्मशाला येथे खेळवला जाणार आहे. टीम इंडियाचा मधल्या फळीतला भरवशाचा फलंदाज के. एल. राहुल दुखापतीतून सावरून या सामन्याद्वारे संघात पुनरागमन करेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती, मात्र राहुलची दुखापत अद्याप बरी झालेली नाही. त्यामुळे राहुल पाचव्या कसोटी सामन्यालाही मुकणार आहे. दरम्यान, भारतासाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराहचे संघात पुनरागमन झाले आहे.






दरम्यान, वॉशिंग्टन सुंदरदेखील पाचव्या कसोटी सामन्यात टीम इंडियाचा भाग नसेल. रणजी सामना खेळण्यासाठी सुंदरला टीम इंडियातून मुक्त करण्यात आले आहे. तमिळनाडूचा संघ रणजी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मुंबईशी भिडणार आहे. सुंदर या सामन्यात तमिळनाडूचे प्रतिनिधीत्व करेल. दरम्यान, त्याच्या जागी दुसऱ्या कोणत्याही खेळाडूची संघात निवड झालेली नाही.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने एक अधिकृत निवेदन जारी केले आहे. यामध्ये म्हटलेय की, राहुल फिटनेस टेस्टमध्ये पास झाला असता तर त्याला संघात संधी दिली जाईल असे निवड समितीने आधी जाहीर केले होते, पण राहुल अद्याप दुखापतीतून सावरलेला नाही. त्यामुळे त्याला पाचव्या कसोटीत विश्रांती दिली आहे. बीसीसीआयचे वैद्यकीय पथक राहुलच्या फिटनेसवर लक्ष ठेवून आहे. अधिक चांगल्या उपचारांसाठी राहुलला लंडनला पाठवण्यात आले आहे.

बुमराहला चौथ्या कसोटीपूर्वी संघातून मुक्त करण्यात आले होते, परंतु पाचव्या कसोटीसाठी तो उपलब्ध असणार आहे. त्यामुळे बुमराह धर्मशालाच्या मैदानावर खेळताना दिसेल. दुखापतग्रस्त मोहम्मद शमी अद्याप संघाबाहेर आहे. शमीवर लंडनमध्ये एक शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शमीला मैदानावर परतण्यास तीन ते चार महिने वाट पाहावी लागेल.

## रायगड जिल्हा सब ज्युनिअर मुलींच्या क्रिकेट संघाची निवड चाचणी उद्या लोधिवलीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड क्रिकेट असोसिएशनतर्फे १५ वर्षांखालील मुलींचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी रविवारी (दि.३) लोधिवली येथील रिलायन्स पेट्रो ग्राउंडवर निवड चाचणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या निवड चाचणीतील कामगिरीच्या आधारे रायगडचा मुलींचा क्रिकेट संघ निवडला जाईल.



१ सप्टेंबर २००९नंतर आणि ३१ ऑगस्ट २०११पूर्वी जन्मलेल्या रायगड जिल्ह्यातील मुली या निवड चाचणीसाठी पात्र असतील. निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी स्वतःचे आधार कार्ड घेऊन येणे अनिवार्य आहे. क्रिकेटचा सफेद गणवेश परिधान करून खेळाडूंनी ३ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता निवड चाचणीच्या ठिकाणी हजर राहावे. अधिक माहितीसाठी माहितीसाठी प्रशांत ओक (९८२२४२२६७६), संदीप पाटील (८३६९७८९३८५,९९२०५४८१८१), सचिन मते (९८२२१५०३०३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असिसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी केले आहे.



## केपीएलमध्ये व्हॉईस ऑफ मीडिया संघ विजेता

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली पत्रकार क्रिकेट चषकाचे आयोजन आकाश जाधव, तय्यब खान, अनिल वाघमारे, अरुण नलावडे, महेबुब जमादार आदींनी केले होते. या स्पर्धेत पत्रकारांसह आजी-माजी नगरसेवक, डॉक्टर असोसिएशन, खोपोली नगर परिषद कर्मचारी, खोपोली-खालापूर पोलीस कर्मचारी व क्रिकेट रसिकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. अंतिम सामन्यात खोपोली नगर परिषद कर्मचारी व अधिकारी यांच्या संघाला व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेच्या संघाने नमवित विजेतेपद पटकाविले.

माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील पाटील, माजी नगरसेवक अमोल जाधव, सामाजिक कार्यकर्ते अरुण गायकवाड यांच्या हस्ते महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करीत तसेच मैदानाचे पूजन करून स्पर्धेचे उद्घाटन झाले.

या स्पर्धेत फैजान खलिल सुर्वे उत्कृष्ट फलंदाज, तर सुबोध भोसले उत्कृष्ट गोलंदाज ठरला. या वेळी माजी नगरसेवक नरेश जाधव, नितीन मोरे, दिनेश थोरवे, सचिन मोरे, राकेश शेलार, प्रदीप मोरे, ज्येष्ठ पत्रकार जयवंत माडपे, अरुण नलावडे, दिनेश पाटील, सागर जाधव आदी उपस्थित होते.

## खोपोलीतील बुद्धिबळ स्पर्धेत गोपाळ राठोड प्रथम



**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोलीतर्फे आयोजित राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन मिलिंद बोधनकर यांनी रामशेठ ठाकूर हॉल शिशु मंदिर येथे केले होते. या स्पर्धेत १२५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. यातील खुल्या गटात गोपाळ राठोड यांनी प्रथम क्रमांक मिळवला. त्यांना रोख पाच हजार रुपये व ट्रॉफी असे बक्षीस देण्यात आले.

द्वितीय क्रमांक विशाल धारिया यांनी (३५०० रु. व ट्रॉफी), तृतीय क्रमांक नाडर थांगराज (२५०० रु. व ट्रॉफी) यांनी मिळविला. या गटात एकूण १६ बक्षिसे देण्यात आली. १५ वर्षे गटात प्रथम क्रमांक अपेक्षा मार्भाल अलिबाग (रोख दोन हजार रु. व ट्रॉफी), द्वितीय अभिलाष यादव पनवेल (१५०० रु. व ट्रॉफी), तृतीय क्रमांक अथर्व वाघ अलिबाग (१००० रु. व ट्रॉफी) व इतर १५ बक्षिसे देण्यात आली. ११ वर्षाखालील गट प्रथम अद्वय ढेने पेण (२००० रु. व ट्रॉफी), द्वितीय श्रीलक्ष्मी नायर डोंबिवली (१५०० रु. व ट्रॉफी), तृतीय क्रमांक विनय सरेंगण (पुणे १००० रु. व ट्रॉफी) व इतर १५ बक्षिसे देण्यात आली.

माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, रोटरी क्लबचे ज्येष्ठ सदस्य दिवाकरन पिल्ले यांच्या हस्ते देण्यात आली. या स्पर्धेचे सर्व काम रायगड जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे पदाधिकारी तसेच शिक्षकवर्ग यांनी पाहिले.

## बंगालच्या माजी क्रिकेटपटूने केला मॅच फिक्सिंगचा आरोप

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये खेळलेला विकेटकीपर-फलंदाज श्रीवत्स गोस्वामीने कोलकाता लीग क्रिकेटमध्ये मॅच फिक्सिंग झाल्याचा मोठा दावा केला आहे.

गोस्वामीने आरोप केला की, ज्या प्रकारे काही खेळाडू बाद झाले, त्यावरून बंगाल क्रिकेट असोसिएशनच्या (सीएबी) फर्स्ट डिव्हिजन लीगमधील एक सामना फिक्स झाल्याचे दिसत आहे. हे सर्व पाहून मन दुखावल्याचे गोस्वामी आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबादकडूनही खेळला आहे.




मोहोपाडा : कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून सुमारे १०० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा मंत्री रवींद्र चव्हाण, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदींच्या उपस्थितीत झाला.

## अलिबाग प्रीमिअर लीगचे शानदार उद्घाटन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील झिराड येथे आयोजित करण्यात आलेल्या अलिबाग प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे गुरुवारी (दि.२९) शानदार उद्घाटन झाले. भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ यांच्या संकल्पनेतून मागील तीन वर्षांपासून अलिबाग प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धा आयोजित केली जात आहे.



माजी आमदार तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, दिलीप भोईर, झिराडच्या माजी सरपंच दर्शना भोईर, माजी उपसरपंच सुजाता माने, निखील चव्हाण, संतोष पाटील, साळाव सरपंच वैभव कांबळे, अभिलाष माळवी, अशोक वारगे उपस्थित होते. तालुकाध्यक्ष उदय काठे, जिल्हा चिटणीस सतीश लेले यांच्यासह भाजपाचे पदाधिकाऱ्यांनी या क्रिकेट स्पर्धेला भेट दिली.

दिलीप भोईर यांच्या संकल्पनेतून अलिबाग प्रीमिअर लीग ही क्रिकेट स्पर्धा गेले तीन वर्षे क्रीडारसिकांना आकर्षित करीत आहे. भव्य आयोजन, उत्तम नियोजन आणि आकर्षक बक्षिसे यामुळे ही स्पर्धा लक्ष वेधून घेते. या वर्षीही मोठ्या प्रमाणात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भव्य मैदानावर हिरवळ पसरविण्यात आली आहे. त्याचबरोबरच प्रेक्षकांना बसण्यासाठी गॅलरी तयार करण्यात आली आहे.

या वर्षी अलिबाग प्रीमिअर लीगसाठी १६ संघांनी आपला सहभाग नोंदवला. गुरुवारी रात्री आठ सामने खेळविण्यात आले, तर उर्वरित आठ सामने शुक्रवारी खेळविले गेले. यानंतर २ तारखेला अंतिम सामने खेळविले जातील. दरम्यान, या प्रीमिअर लीगसाठी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविणाऱ्या संघाला तीन लाख रुपये रोख आणि २४ कॅरेट सोन्याचा मुलामा चढविलेली भव्य आकर्षक ट्रॉफी बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. उपविजेत्या संघाला दोन लाख रोख आणि चषक आणि तिसऱ्या व चौथ्या क्रमांकाच्या संघाला प्रत्येकी एक लाख रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

अलिबाग प्रीमिअर लीग ही क्रिकेट स्पर्धा खेळविताना लिलाव पद्धतीने खेळाडू निवडण्यात आले. त्यामध्ये प्रथम क्रमांक विजेत्या संघमालकाला व मालिकाविरालादेखील दुचाकी देऊन गौरविण्यात येणार आहे, तर सहा सायकलींसह इतर बक्षिसेही देण्यात येणार आहेत.



## शालेय कॅरम स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे संस्थेचे क्रीडा सल्लागार व श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे माजी अध्यक्ष नरेंद्र राणे यांच्या षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त विनाशुल्क शालेय कॅरम स्पर्धेचे आयोजन ४ व ५ मार्च रोजी करण्यात आले आहे. १५ वर्षाखालील व इयत्ता ९ वीपर्यंतच्या शालेय मुला-मुलींसाठी ही स्पर्धा मोफत खुली आहे. स्पर्धेतील पहिल्या आठ विजेत्यांना आकर्षक चषक व 'स्ट्रायकर' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

गेली दशकभर शालेय क्रीडा चळवळीमधील विविध उपक्रमांना प्रोत्साहन देणारे क्रीडापटू नरेंद्र राणे यांच्या आग्रहास्तव शालेय खेळाडूंना मोफत कॅरम प्रशिक्षण शिबिर येत्या एप्रिलमध्ये वार्षिक परीक्षेनंतर देण्यात येणार असल्याचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते यांनी जाहीर केले. चॅम्पियन कॅरम सेटवर ही स्पर्धा मुंबईतील परळ आरएमएमएस येथे होणार आहे. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या शालेय खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक (९००४७५४५०७) यांच्याशी ३ मार्च सायंकाळी ६ वाजेपर्यंत संपर्क साधावा.

## रायगडची पॉवरलिफ्टिंग स्पर्धा उद्या

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

जिल्हास्तरीय क्लासिक पॉवरलिफ्टिंग तसेच नवोदित, सीनिअर, मास्टर (पुरुष आणि महिला) स्पर्धा रविवारी (दि.३) आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा खोपोली मुळगाव श्रीराम नगर, भैरवी मंगल कार्यालय येथे होणार आहे

या स्पर्धेत भाग घेतलेल्या खेळाडूंनी वजनासाठी वेळेवर म्हणजे सकाळी ९ ते ९.३० या वेळेत हजर राहणे अपेक्षित आहे. व्यायामशाळा, जिम, हेल्थ क्लब संचालक, व्यवस्थापक, प्रशिक्षक यांनी संबंधित खेळाडूंना योग्य त्या सूचना द्याव्यात. स्पर्धेसाठी गोल गळ्याची बनियन (जिमचे नाव असलेली), कॉस्च्युम, पायात शूज, कमरेचा पट्टा अशा प्रकारचा गणवेश आवश्यक आहे. मास्टर गटातील खेळाडूंकडे वयाचा मूळ पुरावा झेरॉक्स कॉपीसह आणणे आवश्यक आहे.



जिल्हास्तरीय स्पर्धेतून राज्य स्पर्धेसाठी संघ पाठविला जाणार आहे. जे स्पर्धक दुहेरीत भाग घेतील व विजयी होतील त्याला टोटल चांगली असेल तर एकाच राज्य स्पर्धेत निवड करण्यात येईल.

नवोदित स्पर्धा प्रथमच पॉवरलिफ्टिंग करणाऱ्या खेळाडूंसाठीच आहे. या स्पर्धेतील खेळाडू वयोमानानुसार इतरही स्पर्धा खेळू शकेल. सर्व स्पर्धकांना स्पर्धेसाठी कोणतेही उत्तेजक घेतले नसल्याबाबत हमीपत्र भरून देणे अपेक्षित आहे, असे पत्रक सचिव अरुण पाटकर (९९६९८५२०८६) यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

स्पर्धेसाठी खोपोलीचे पॉवरलिफ्टिंग खेळाडू व प्रशिक्षक विक्रांत गायकवाड आणि सहसचिव पनवेलचे सचिन भालेराव हे व्यवस्थापन समिती म्हणून काम करीत आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com